# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.01.2025** **वार-बुधवार**

---

**अवयव दान**

पुण्यात गेल्या वर्षभरात मृत व्यक्तिंच्या शरीरातील 70 अवयवदानाची नोंद झाली असल्याची माहिती पुणे विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीनं दिली आहे. पुणे परिमंडळातील प्रत्यारोपण केलेल्या अवयवांची संख्या 181 आहे. यामध्ये मूत्रपिंड 93, यकृत 58, हृदय 6, मूत्रपिंड आणि स्वादुपिंड 4, हृदय 1 आणि 14 फुफ्फुसं अशा अवयवांचा समावेश आहे असं समितीचे अध्यक्ष ए.जी. हुपरीकर यांनी सांगितलं. अवयवदानाचं कार्य अनेकांसाठी प्रेरणास्त्रोत बनलं असून 181 जणांचे प्राण वाचविण्यात यश मिळालं आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधांद्वारे 7 अवयवांचं दान करण्यात आलं. त्यात ससून रुग्णालयातील 1 आणि कमांड हॉस्पिटलमधील 6 अवयवदानांचा समावेश आहे.

**साखर**

राज्यात आतापर्यंत 303 लाख 53 हजार मेट्रीक टन उसाचं गाळप पूर्ण  झालं आहे, तर आठ पूर्णांक पाच टक्के सरासरी उता-यानुसार 25 लाख 81 हजार मेट्रीक टन साखरेचं उत्पादन झालं आहे. पुणे विभाग 70 लाख 16 क्विंटल सर्वाधिक साखर उत्पादन तयार करून आघाडीवर आहे. राज्यात 96 सहकारी आणि 93 खासगी साखर कारखान्यांकडून दररोज नऊ लाख 61 हजार मेट्रीक टन ऊस गाळप सुरू आहे. साखर कारखान्यांकडून ऊस गाळपाचा वेग वाढल्याची माहिती साखर आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

**लष्कर दिन**

येत्या 15 तारखेला नियोजित लष्कर दिन संचलनाची पूर्वतयारी म्हणून भारतीय लष्कराच्या दक्षिण कमांडद्वारे 3 ते 5 जानेवारी दरम्यान-लष्कराला जाणून घ्या- या शीर्षकाचा मेळावा रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब इथं आयोजित केला आहे. हा मेळा सर्वसामान्य लोकांसाठी सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत तिन्ही दिवस खुला असेल. या मेळ्यामध्ये अत्याधुनिक शस्त्रं आणि उपकरणं, केंद्रीय दूरसंचार विभागाद्वारे छायाचित्र प्रदर्शन, युद्ध कला, वाद्यवृंद आणि श्वानांची प्रात्यक्षिकं सादर करण्यात येतील.

**रामदास आठवले**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी स्मारकासाठी समाज कल्याण विभागानं तयार केलेल्या आराखड्यानुसार भीमा कोरेगाव इथल्या विजय स्तंभाजवळ आंबेडकर स्मारकासाठी जागा द्यावी आणि दीडशे कोटी रुपयांची तरतूद  करावी अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे असल्याची माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. खाते वाटपामध्ये एक जागा रिक्त असून ते खातं रिपब्लिकन पक्षाला द्यावं तसंच आगामी पुणे महापालिका निवडणुकीमध्ये रिपब्लिकन पक्षाला वीस जागा मिळाव्यात तसंच अडीच वर्षांसाठी महापौर पदही देण्यात यावं अशीही मागणी आठवले यांनी यावेळी केली. बीड जिल्ह्यात शांतता नांदावी यासाठी वाल्मीक कराड याला कठोर शिक्षा करावी. या

प्रकरणाचा धनंजय मुंडे यांच्याशी ही संबंध नसून त्यांनी मंत्रीपदाच्या राजीनामा देण्याची गरज नसल्याचंही आठवले यांनी यावेळी सांगितलं.

**<u>विजयस्तंभ</u>**

पेरणे इथला विजयस्तंभ हे एक प्रेरणास्थान असून देशातील, राज्यातील लाखो अनुयायी इथं अभिवादनासाठी येत असतात. येणाऱ्या अनुयायांसाठी प्रशासनाकडून चांगल्या प्रकारच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, असं आज विजयस्तंभाला अभिवादन केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं.

भरणे यांनी आज सकाळी पेरणेफाटा इथल्या ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले. यावेळी आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, बार्टीचे महासंचालक सुनील वारे आदी उपस्थित होते. अनुयायांसाठी आवश्यक सुविधा भविष्यात करण्याच्या दृष्टीनं राज्य शासन काम करेल, असंही भरणे यावेळी म्हणाले.

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनीही आज सकाळी विजयस्तंभास अभिवादन केलं. पेरणेफाटा इथल्या विजयस्तंभ अभिवादन सोहोळ्याच्या अनुषंगानं जिल्हा प्रशासनानं उत्तम व्यवस्था केल्याबद्दल राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी समाधान व्यक्त केलं.

विजय स्तंभावर अभिवादन करण्यासाठी हजारो अनुयायी पेरणेफाटा इथं जमले असून प्रशासनानं चोख पोलिस बंदोबस्तासह सर्व व्यवस्था केली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने ए-स्क्वेअर प्रीमिअर लीग 12 आणि 14 वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धा पार पडल्या. यामध्ये 12 वर्षाखालील गटात रॉयल्स् इलेव्हन आणि 14 वर्षा खालील गटात सुपरजायंट्स इलेव्हन यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आपल्या गटाचं विजेतेपद मिळवलं. आदित्य दिघे यानं केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर रॉयल्स् इलेव्हन संघानं चॅलेंजर्स इलेव्हनचा 2 धावांनी निसटता पराभव करून विजेतेपद मिळवलं. तर सोहम राऊत यानं केलेल्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर सुपरजायंट्स इलेव्हननं सुपरकिंग्ज इलेव्हनचा 8 गडी राखून सहज पराभव केला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात किमान तापमानात घट दिसून येत आहे. मात्र कमाल तापमान उद्या 31 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज आहे. किमान तापमान 14 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**